सत्यमेव जयते

उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालय

==========

Email-sdm.chandrapur@gmail.com PhoneNo.07172-251401

==========

रा.मा.कं.०७ /सी.टि.एस.५२/२०१८-२०१९
मौजा-देवई गोंविदपूर तुकुम.तह.चंद्रपूर
दिनांक ०६ फेबुवारी,२०१९

परिशिष्ट "ब"

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ च्या कलम ४२-अ मधील तरतुदींन्वये
नियोजन प्राधिकरणाने बांधकाम/विकास परवानगी दिली आहे,
अशा जमिनीच्या भोगवटादारास द्यावयाच्या सनेदचा नमूना

ज्याअर्थी, जिल्हा **चंद्रपूर** तालुका चंद्रपूर गांव मोहल्ला **मौजा देवई गोंविदपूर तुकूम** भुमापन क्रमांक ६,९,२५ आराजी,क्षेत्र ६५१.०० चौरस मीटर या जमिनीच्या **सौ. सरोज सुरेश महाकुलकर.रा.दे.गो.तुकूम,चंद्रपूर** यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ च्या कलम ४२-अ च्या तरतुदीन्वये निवास अकृषिक प्रयोजनासाठी सदर जमिनीचा विकास करण्यास आयुक्त, चंद्रपूर महानगर पालीका,चंद्रपूर यांचे विकास परवानगी प्रमाणपत्र क्रमाक चंशमनपा/नर/अभिन्यास/स.नं.६,९,२५/८२३/२०१८,दिनांक ३०/११/२०१८ अन्वये विकास / बांधकाम परवानगी प्राप्त केली आहे, ज्यासंबधी नियोजन प्राधिकरणाने मंजूर केलेला नकाशा या सनदे सोबत संलग्न आहे.

आणि ज्याअर्थी उक्त जमिनीच्या भोगवटादाराने शासनाला, उक्त संहितेच्या कलम-४७ अ नुसार देय रुपांतरण कराची व वर नमूद अकृषिक प्रयोजनार्थ वापरापोटी आकरणीची रककम **रुपये एकूण १००८, दि. ०६ / ०२/ २०१९ पावती क्रमांक १६४४९२८ रुपये** १६८ /- व १६४४९२७ **रुपये** ८४०/- रोजी भरणा केली आहे.

त्याअर्थी आता, उक्त संहितेमधील तरतूदीच्या आणि तद्न्वये करण्यांत आलेल्या नियमांच्या तरतुदींना आणि खालील शर्तींना अधीन राहून उपरोक्त जमिनीच्या भोगवटादारास

उप विभागीय अधिकारी कार्यालय चंद्रपूर

सदर नियोजन प्राधिका-याच्या वर उल्लेखित विकास / बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने सदर जमिनीवर अनुज्ञेय करण्यात आलेल्या अकृषिक वापरापोटी उक्त संहितेच्या कलम ४२-अ अन्वये ही सनद देण्यात येत आहे.

१) **आकारणी :** उक्त जमिनीचा भोगवटादार उक्त जमिनीच्या संबंधात, पहिली अगोदर वसुली योग्य असलेल्या आकरणी ऐवजी वर उल्लेखित विकास/बांधकाम परवानगी प्राप्त झाल्यापासून **दिनांक ३१ जुलै,२०१९ रोजी** संपणा-या हमीच्या कालावधीत शासनाला प्रत्येक वर्षी **रुपये ०.५६ प्रति चौरस मीटर प्रमाणे रुपये १६८/- (अक्षरी एकशे अडूसष्ट फक्त)** या दराने परिगणित होणारी वार्षिक आकारणी देईल आणि उक्त कालावधी संपल्यानंतर, उक्त संहिते अन्वये जिल्हाधिका-याकडून, वेळोवेळी निश्चित करण्यात येईल, अशी सुधारित आकारणी देईल.

२) उक्त जमिनीचा भोगवटार उक्त जमिनीवर वसुली योग्य असलेले सर्व कर,दर आणि उपकर भरील

३) वरीलप्रमाणे मंजूर केलेल्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये नियोजन प्राधिकरणा च्या पुर्व मंजूरीशिवाय कोणताही बदल करु नये व ही सनद निर्गमित झाल्यानंतर नियोजन प्राधिकरणाच्या पूर्व मान्यतेने सदर जमिनीच्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्यास त्याची माहिती, असा अदल नियोजन प्राधिकरणाकडून मंजूर झाल्यापासून ३० दिवसांच्या आंत जिल्हाधिकारी यांना देणे भोगवटादारावर बंधनकारक राहील.

४) उक्त जमिनीच्या भोगवटादाराने पूर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास जिल्हाधिका-यास,उक्त संहितेच्या आणि तद्न्वये करण्यांत आलेल्या नियमांच्या तरतुदीअन्वये जी भरण्यास उपयोगकर्ता दायी असेल अशी इतर कोणत्याही शास्तीस बाधा न आणता त्यास योग्य वाटेल अशी आकारणी भरल्यावर आणि कलम ३२९ च्या पोट कलम (२) च्या अधीनतेने,त्यास योग्य वाटेल एवढा दंड भरल्यावर उक्त जमिन भोगवटादार यांच्या वहिवाटीत असण्याचे चालू ठेवता येईल.

त्याची साक्ष म्हणून उपविभागीय अधिकारी,चंद्रपूर या उपविभागीय अधिका-याने, महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने आपली सही केली आणि आपल्या पदाची मोहोर लावली आहे आणि अर्जदाराने सुध्दा यावर दिनांक०६ फेबुवारी, २०१९ रोजी आपली सही केली आहे

X सौ. सरोज सुरेश महाकुलकर

(सौ.सरोज सुरेश महाकुलकर)

(भोगवटदारांची स्वाक्षरी)

1) अक्षय मारोती भोयर - अमानोयर

2) डॉ.सुरेश रा.महाकुलकर

(साक्षीदारांच्या स्वाक्ष-या व पदनामे)

उपविभागीय अधिकारी,चंद्रपूर

आम्ही असे जाहिर करतो की जिने या सनदेवर सही केली आहे,ती व्यक्ती आमच्या वैयक्तीक माहितीप्रमाणे ती जी व्यक्ती असल्याचे म्हणत आहे, तिच व्यक्ती आहे आणी तिने आमच्या समक्ष आपली सही केली आहे.

(साक्षीदारांच्या स्वाक्ष-या व पदनामे)

1) अक्षय मारोती भोयर - अमानोयर

2) डॉ.सुरेश रा.महाकुलकर

प्रत १) आयुक्त,चंद्रपूर शहर महानगर पालीका,चंद्रपूर यांना माहितीस्तव सस्नेह

२) तहसिलदार,चंद्रपूर यांना माहिती व उचित कार्यवाहीस अग्रेषित.

३) तलाठी,दुर्गापूर तहसिल चंद्रपूर यांना माहिती व उचित कार्यवाही करीता

४) **सौ. सरोज सुरेश महाकुलकर.रा.दे.गो.तुकूम,चंद्रपूर** यांना माहिती करीता अग्रेषित

उपविभागीय अधिकारी,
चंद्रपूर